# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

## मा.स्थायी समिती

## कार्यपत्रिका क्रमांक – ५७

## (सभावृत्तांत)

दिनांक - ०४/०४/२०१८ वेळ – दुपारी ०२.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार, दिनांक ०४/०४/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.ममता विनायक गायकवाड - सभापती
२. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३. मा.अमित राजेंद्र गावडे
४. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
५. मा.आंगोळकर सागर सुनिल
६. मा.लोंढे नम्रता योगेश
७. मा.मडिगेरी विलास हनुमंतराव
८. मा.गीता सुशिल मंचरकर
९. मा.खानोलकर प्रज्ञा महेश
१०. मा.लांडगे सारिका संतोष
११. मा.बोईनवाड यशोदा प्रकाश
१२. मा.डोळस विकास हरिश्चंद्र
१३. मा.बारणे अर्चना तानाजी
१४. मा.साधना अंकुश मळेकर

याशिवाय मा.आष्टीकर-प्र.अतिरिक्त आयुक्त,मा.उल्हास जगताप-नगरसचिव,मा.तळदेकर-मुख्य लेखापरिक्षक, मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.ठाकूर-उपसंचालक नगररचना, मा.लांडे-मुख्यलेखापाल,मा.पाटील,मा.दुधेकर,मा.पठाण-सहशहर अभियंता,मा.डोईफोडे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर,मा.लोणकर,मा.बोदडे,मा.खोराटे,मा.खोत,मा.झगडे,मा.राऊत-सहाय्यक आयुक्त,मा.पवार-प्र.कायदा सल्लागार,मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक,मा.पाटील-प्राचार्य,औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, मा.इंगळे,मा.तांबे,मा.लडकत,मा.कुलकर्णी,मा.जुंधारे,मा.गलबले,मा.कांबळे,मा.गट्टूवार,मा.भोसले, मा.मोरे,मा.पाटील,मा.कांबळे,मा.पवार,मा.मोरे-कार्यकारी अभियंता,मा.डॉ.दरडे-पशुवैद्यकीय अधिकारी, मा.प्रभावती गाडेकर,मा.रेखा गाडेकर-प्रशासन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सूचक – मा.विलास मडिगेरी                    अनुमोदक-मा.शितल उर्फ विजय शिंदे

ज्येष्ठ समाजवादी नेते भाई वैद्य यांचे नुकतेच निधन झाले असल्याने त्यांना श्रद्धांजली वाहून आजची सभा बुधवार दिनांक-११/४/२०१८ रोजी दुपारी १.४५ वा. पर्यंत तहकूब करण्यात यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

--------

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.सभापती** - आजची सभा बुधवार दिनांक-११/४/२०१८ रोजी दुपारी १.४५ वा. पर्यंत तहकूब करण्यात येत आहे.

**(ममता विनायक गायकवाड)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

## मा.स्थायी समिती

## कार्यपत्रिका क्रमांक – ५७

## (सभावृत्तांत)

## (दि.०४/०४/२०१८ ची तहकूब सभा)

दिनांक - ११/०४/२०१८ वेळ – दुपारी ०१.४५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दिनांक ०४/०४/२०१८ रोजी दुपारी २.०० वा. ची तहकूब सभा दि.११/०४/२०१८ रोजी दु.१.४५ वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.ममता विनायक गायकवाड - सभापती
२. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३. मा.राजू मिसाळ
४. मा.अमित राजेंद्र गावडे
५. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
६. मा.आंगोळकर सागर सुनिल
७. मा.लोंढे नम्रता योगेश
८. मा.मडिगेरी विलास हनुमंतराव
९. मा.गीता सुशिल मंचरकर
१०. मा.खानोलकर प्रज्ञा महेश
११. मा.लांडगे सारिका संतोष
१२. मा.बोईनवाड यशोदा प्रकाश
१३. मा.डोळस विकास हरिश्चंद्र
१४. मा.बारणे अर्चना तानाजी
१५. मा.साधना अंकुश मळेकर

याशिवाय मा.श्रावण हर्डीकर-आयुक्त, मा.आष्टीकर-प्र.अतिरिक्त आयुक्त,मा.उल्हास जगताप-नगरसचिव,मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक,मा.चव्हाण-शहर अभियंता,मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैद्यकीय अधिकारी,मा.लांडे-मुख्यलेखापाल, मा.गावडे-सहआयुक्त, डॉ.साळवे-वैद्यकीय संचालक, मा.पाटील,मा.तुपे,मा.दुधेकर,मा.पठाण-सहशहर अभियंता,मा.डोईफोडे,मा.लोणकर,मा.खोराटे-सहाय्यक आयुक्त,मा.पवार-प्र.कायदा सल्लागार, मा.गायकवाड-उद्यान अधिक्षक, मा.पाटील-प्राचार्य,औद्योगिक प्रशिक्षण केंद्र,मा.आवारी-प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ), मा.पोमण -मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.निकम, मा.सवणे, मा.इंगळे,मा.तांबे,मा.चव्हाण,मा.लडकत,मा.कुलकर्णी, मा.जुंधारे, मा.गलबले,मा.कांबळे,मा.ओंभासे, मा.गट्टूवार,मा.पुजारी,मा.गायकवाड,मा.पाटील,मा.घुबे-कार्यकारी

अभियंता, मा.डॉ.दरडे-पशुवैद्यकीय अधिकारी,मा.जगताप-कामगार कल्याण अधिकारी,मा.गिरी-अंतर्गत लेखापरिक्षक (पीएमपीएमएल) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------

अ) दिनांक २१/०३/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ५५) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दिनांक २८/०३/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ५६) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – २५०७ विषय क्रमांक - १
दिनांक – ११/०४/२०१८ विभाग – माहिती व जनसंपर्क
सूचक – मा.नम्रता लोंढे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.माजसं/२/कावि/१३६/२०१८ दि.१४/३/२०१८
विषय- माध्यम समन्वयक संस्था नेमणूकीबाबत...

विषय क्रमांक १ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २५०८ विषय क्रमांक - २
दिनांक – ११/०४/२०१८ विभाग – स्थापत्य मुख्य कार्यालय
सूचक – मा.नम्रता लोंढे अनुमोदक – मा.विलास मडिगेरी
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/इमु/कावि/१२३/१८ दि.१५/२/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र. ३१/१/२०१७-१८ अन्वये इ प्रभाग अंतर्गत विविध कंपन्याच्या/मनपाच्या सेवावाहिन्या टाकण्यासाठी खोदलेल्या रस्त्यांचे दुरुस्ती करणे (सन२०१७-१८) मनपा. क्षेत्रातील डांबरी रस्त्यावरील खड्डे "JET PATCHER POTHLE PATCHING MACHINE" व्दारे भरणेकामी बी-२ प्रकारच्या निविदेस प्राप्त ठेकेदारापैकी सर्वात कमी किंमतीची मे. अंजनी लॉजिस्टिक यांची र.रु.८,३२,४१,७७२/- (अक्षरी र.रु. आठ कोटी बत्तीस लाख एक्केचाळीस हजार सातशे बहात्तर फक्त) निविदा प्राप्त झाल्याने, प्राप्त मंजुर दराने काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांच्या बरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २५०९ विषय क्रमांक - ३
दिनांक – ११/०४/२०१८ विभाग – नगररचना व विकास
सूचक – मा.सारिका लांडगे अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.नरवि/कावि/१६/१०६५/२०१८ दि.१९/३/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

नगररचना व विकास विभागाने मौजे बो-हाडेवाडी येथील पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण यांच्या ताब्यातील पेठ क्र.५ व ८ मधील १६ आर क्षेत्र उद्यान, खेळाचे मैदान व शाळा बांधणेकरीता मनपास जागा हस्तांतरण करणे बाबत कळविले होते. त्यास अनुसरुन मुख्य कार्यकारी अधिकारी, पिं.चिं.न.वि.प्रा.यांनी दिनांक ४/१२/२०१७ चे पत्रान्वये ग.नं.५४४ शेजारील जागेलगत असणा-या पेठ क्र.५ व ८ मध्ये १६ गुंठे जागा निवासी वापराची असुन सदर भुखंडाचे अधिमुल्य र.रु.२,०७,३६,०००/- (र.रु.१२,९६०/- प्रती चौ.मी.दराने अंदाजित १६०० चौ.मी.साठी) भरणेस तयार आहे का? याची विचारणा या विभागास केली व असल्यास मा.आयुक्त, पिं.चिं.मनपा यांचेमार्फत तशी माहिती कळविण्यास सांगितले होते. मौजे बो-हाडेवाडी येथील उपरोक्त सदर परिसरात उद्यान, खेळाचे मैदान, व शाळा बांधणे गरजेचे असुन सदर प्रकरणी अंमलबजावणी करणेस मा.आयुक्त सो यांनी मान्यता दिलेली आहे. तरी सदर मौजे बो-हाडेवाडी येथील पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण यांच्या ताब्यातील पेठ क्र.५ व ८ मधील ग.नं.५४४ शेजारील ०.१६ आर हे. आर. क्षेत्रामध्ये उद्यान, खेळाचे मैदान व शाळा बांधणेकरीता मनपास आवश्यक जागा हस्तांतरीत करण्यासाठी र.रु.२,०७,३६,०००/-(अक्षरी र.रू.दोन कोटी सात लाख छत्तीस हजार फक्त) एवढ्या भुखंडाचे अधिमुल्यासह भाडेपट्टा करार नोंदविण्याकामी अपेक्षित सर्व अनुषंगिक खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २५१० विषय क्रमांक - ४
दिनांक – ११/०४/२०१८ विभाग – मुख्यलेखापरिक्षण
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.साधना मळेकर
संदर्भ– मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/७०/२०१८ दि.२०/३/२०१८

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये दि.२६/०२/२०१८ ते दि.०४/०३/२०१८ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/७०/२०१८ दि.२०/०३/२०१८ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २५११ विषय क्रमांक - ५
दिनांक – ११/०४/२०१८ विभाग – मुख्यलेखापरिक्षण
सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक–मा.नम्रता लोंढे
संदर्भ– मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र. मुलेप/६/कावि/७१/२०१८ दि.२०/३/२०१८

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये दि.०५/०३/२०१८ ते दि.११/०३/२०१८ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/७१/२०१८ दि.२०/०३/२०१८ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २५१२ विषय क्रमांक - ६
दिनांक – ११/०४/२०१८ विभाग – ड क्षेत्रीय कार्यालय
सूचक –मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ– मा.सहा.आयुक्त तथा क्षेत्रिय अधिकारी यांचे जावक क्र.डक्षेका/३/कावि/२५४/२०१८ दि.२३/३/२०१८

मा.सहा.आयुक्त तथा क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ड क्षेत्रीय कार्यालयाकडील विद्युत विभागाचे निविदा कामांच्या सोबतचे प्रपत्र अ मधील (1 ते 2) नियमानुसार व निविदा अटी-शर्ती प्रमाणे लघुतम दराच्या निविदा स्विकारणेत आलेल्या असुन मंजुर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २५१३ विषय क्रमांक - ७
दिनांक – ११/०४/२०१८ विभाग – पाणीपुरवठा
सूचक – मा.साधना मळेकर अनुमोदक – मा.नम्रता लोंढे
संदर्भ– मा.सहशहर अभियंता यांचे जावक क्र.पापु/६/कावि/१२८०/२०१८ दि.२२/०३/२०१८

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ (१ ते १) मधील निविदा कामांचे अवलोकन होवुन नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे तसेच भाववाढ कलमानुसार भाववाढ देय असल्यास मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहून ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – २५१४ विषय क्रमांक - ८
दिनांक – ११/०४/२०१८ विभाग– यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालय
सूचक – मा.यशोदा बोईनवाड अनुमोदक – मा.सारिका लांडगे
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वायसीएमएच/०८/कावि/११६/२०१८ दि.२७/३/१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंराव चव्हाण स्मृती रुग्णालयामध्ये वैद्यकिय क्षेत्रातील पदव्युत्तर संस्था सुरु करणेबाबत प्रस्तावित आहे. याकरीता दि.७-४-२०१८ पुर्वी केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालयाकडे विहित शुल्कासह अर्ज दाखल करणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामधील पदव्युत्तर संस्थेकरीता भा.आ.प च्या निकषानूसार अध्यापक वर्ग उपलब्ध असलेल्या स्त्रीरोग व प्रसुती, अस्थिरोग, कान-नाक-घसा, पॅथॉलॉजी, बालरोग, भूल शास्त्र, मनोविकृती चिकित्सा, या विषयांकरीता तपासणी शुल्क तसेच भारतीय आयुर्विज्ञान परिषद, यांचा प्राप्त ई-मेल दि.२७/०३/२०१८ नूसार जीएसटी १८ टक्के इतका असून प्रति विषय (र.रू.३६,०००/- जी.एस.टी x ७ विषय) या प्रमाणे र.रू.२,५२,०००/- जी एस टी असे एकूण र.रू.२,५२,०००/- भारतीय आयुर्विज्ञान परिषद यांचेकडे धनाकर्षाने भरणे आवश्यक आहे. सदरची रक्कम ही पी.जी इन्स्टिटयुट या लेखा शिर्षातुन खर्ची टाकावी लागणार आहे. तरी उपरोक्त ७ विषयांच्या तपासणीसाठी जीएसटी एकूण र.रू.२,५२,०००/- (अक्षरी र.रू. दोन लाख बावन्न हजार फक्त) इतका खर्च येणार असून सदर खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २५१५ विषय क्रमांक - ९
दिनांक – ११/०४/२०१८ विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आमुका/३/कावि/२१२/२०१८ दि.२७/३/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने घनकचरा व्यवस्थापन नियम २००० नुसार घरोघरचा कचरा गोळा करुन मोशी कचराडेपो येथे वाहतुक करुन टाकणेकामी ब व क प्रभाग कार्यक्षेत्रातील या कामासाठी निविदा नोटिस क्र.५/२०११-१२ देशपातळीवर प्रसिध्द करुन निविदा मागविणेत आलेली होती. मे.बी.व्ही.जी.इंडिया लि. यांची प्राप्त कमी दराची निविदा प्रतीटन र.रु.७१४/- स्विकृत करुन मा.स्थायी समिती ठराव क्र.१५४९३ दि.२५/१०/२०११ व क्रमांक १६४२१ दि.२०/१२/२०११ अन्वये प्रथम वर्षासाठी प्रतीटन र.रु.७१४/- व त्यापुढील प्रत्येक वर्षासाठी ५% दर वाढीस मान्यता देणेत आलेली आहे. त्यांनी दि.२९/१२/२०११ रोजी करारनामा सादर केलेला आहे. त्यानुसार ५ वर्षे कामाचा आदेश क्र.आमुका/३/कावि/०७/२०१२ दि.०२/०१/२०१२ अन्वये देणेत आलेला आहे. तसेच ब, क, इ व ह क्षेत्रिय कार्यालयांतर्गत प्रायमरी व सेकंडरी कलेक्शन आणि अ, फ व ग क्षेत्रिय कार्यालयांतर्गत कचरा उचलणे व मोशी कचरा डेपोपर्यंत वाहतूक करणेचे

(सेकंडरी कलेक्शन) काम देण्यात आले आहे. सदर कामाची मुदत दि.०२/०१/२०१७ रोजी संपुष्टात आलेली आहे. तदनंतर या कामासाठी वेळोवेळी मुदतवाढ देवून कामकाज सुरु आहे. अ क्षेत्रीय कार्यालयातील प्रभाग क्र.१४ व १७ मध्ये ३ टिपर वाहने व प्रभाग क्र.१८ व १९ मध्ये २ कॉम्पॅक्टर वाहने घरोघरचा कचरा गोळा करणे व वाहतूक करणे (प्रायमरी व सेकंडरी) कामकाज मे.बी.व्ही. जी. क्षितीज वेस्ट मॅनेजमेंट सर्व्हीसेस प्रा.लि. यांचेमार्फत करणेत येत असल्याने त्यांना प्रति मे. टन र.रु.९११/- प्रमाणे बिल अदायगी करण्यास मान्यता मिळालेली आहे. याबाबात कामाचा आदेश क्रं.आमुका/३/कावि/३५७/२०१७, दि.०३/०१/२०१७ देणेत आलेला आहे. सदर कामाची मुदत दि.३१/१०/२०१७ रोजी संपुष्टात आल्यानंतर मा. स्थायी समिती ठराव क्रं.१२८५, दि.१५/११/२०१७ अन्वये दि.०१/११/२०१७ ते दि.३१/०१/२०१८ पर्यंत मुदतवाढ देणेस मान्यता मिळालेली आहे. या मुदतवाढ कामाचा आदेश क्रं.आमुका/३/कावि/४९२/२०१७, दि.२९/१२/२०१७ अन्वये देणेत आलेला आहे. सदर कामाची मुदत दि.३१/०१/२०१८ रोजी संपुष्टात आल्यानंतर मा. स्थायी समिती ठराव क्रं.२३४३, दि.२८/०२/२०१८ अन्वये दि.०१/०२/२०१८ ते दि.३१/०३/२०१८ पर्यंत मुदतवाढ देणेस मान्यता मिळालेली आहे. या मुदतवाढ कामाचा आदेश क्रं.आमुका/३/कावि/१९२/२०१७, दि.१६/०३/२०१८ अन्वये देणेत आलेला आहे. सदर कामाची मुदतवाढ दि.३१/०३/२०१८ अखेर संपुष्टात येत आहे. या कामाच्या नविन निविदेचे कामकाज अंतिम टप्प्यात आले असून निविदेचे काम पुर्ण होणेसाठी अंदाजे ०३ महिने कालावधी लागणार आहे. त्यामुळे वर नमूद केलेल्या कामासाठी मे.बी.व्ही.जी. क्षितीज वेस्ट मॅनेजमेंट सर्व्हीसेस प्रा. लि. यांना दिनांक ०१/०४/२०१८ ते दिनांक ३०/०६/२०१८ अखेर अथवा नविन निविदा कार्यवाही पुर्ण होऊन नवीन संस्थांना कामकाज आदेश देईपर्यंत यापैकी जे प्रथम होईल त्या कालावधी पर्यंत मुदतवाढ देणे व याकामी येणा-या अंदाजे खर्च र.रु.३,३७,०५,९३६/- (अक्षरी र.रु. तीन कोटी सदोतीस लाख पाच हजार नऊशे छत्तीस फक्त) अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक – २५१६ | विषय क्रमांक - १० |
| दिनांक – ११/०४/२०१८ | विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय |
| सूचक – मा.नम्रता लोंढे | अनुमोदक – मा.सागर आंगोळकर |

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आमुका/३/कावि/२११/२०१८ दि.२७/३/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब क्षेत्रीय कार्यालयांतर्गत निवडणूक (जुने) वार्ड क्रं. ४९, ५०, ५१ व ५३ तसेच "क" क्षेत्रीय कार्यालयांतर्गत निवडणूक (जुने) वार्ड क्रं. ५८, ५९ व ६० मधील म.न.पा. चे TATA ACE वाहनामार्फत घरोघरचा कचरा गोळा करणे व संकलन केंद्र येथे वाहुन नेणेचे कामासाठी उपलब्ध वाहनांवर ३८ वाहन चालक, २ सुपरवायझर व ७६ कामगार पुरविणे कामी ई-निविदा नोटीस क्र. ४/२०१५-१६ प्रसिध्द करुन ८ महिने कालावधीकरीता निविदा मागविणेत आल्या होत्या. कामगारांचे वेतन व भत्ते र.रु.९५,८१,२६८/- + सेवाशुल्क

र.रु.९,५८,१२८/- अशी एकूण र.रु.१,०५,३९,३९६/- एवढी निविदेची अंदाजपत्रकीय किंमत होती. निविदेसाठी सेवाशुल्क रकमेवर पात्रता या निकषावर मागविण्यात आलेल्या निविदेत मे. श्री साई मागासवर्गीय स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित यांची सेवाशुल्काच्या ४३.८३% कमी दराने (र.रु.४,२०,०००/-) व एकूण निविदा रकमेच्या ५.१०% कमी दराने निविदा स्विकृत करुन, त्यांची दिनांक २३/०७/२०१६ अखेर ठेकेदार म्हणून नेमणूक करुन कामाचा आदेश देण्यात आला होता. निविदा कालावधी संपुष्टात आल्यानंतर, नियुक्त ठेकेदार यांनी मुदतवाढ कालावधीत काम करणेस नकार दर्शविल्याने निविदेतील सेकंड लोएस्ट संत गाडगेबाबा महाराज बेरोजगार संस्था दापोडी यांची मा.स्थायी समिती कडील ठराव क्र.१७२१९ दि.१४/०९/२०१६ व ठराव क्र.१७५३८ दि.२७/०९/२०१६ अन्वये दि.२४/०७/२०१६ ते दि.०२/०१/२०१७ पर्यंत निविदेतील मंजूर दराने ठेकेदार म्हणून नियुक्ती करणेत आली होती. आदेश क्र.आमुका/३/कावि/६८८/२०१६ दि.०४/१०/२०१६ नुसार सध्या संस्थेमार्फत ४४ वाहनचालक, २ सुपरवायजर व ७६ कामगार उपलब्ध करुन कामकाज सुरु आहे. सदर कामाची मुदत दि.३१/०१/२०१८ अखेर संपुष्टात आली आहे. तद्नंतर या कामासाठी वेळोवेळी मुदतवाढ देवून कामकाज सुरु आहे. सदर कामाची मुदत दि.३१/०१/२०१८ अखेर संपुष्टात आलेली आहे. मा.स्थायी समिती ठराव क्र.२३५६ दि.२८/०२/२०१८ अन्वये या कामास दि.३१/०३/२०१८ अखेरपर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदर मुदतवाढ दि.३१/०३/२०१८ रोजी संपुष्टात येत आहे. या कामाच्या नविन निविदेचे कामकाज अंतिम टप्प्यात आले असून निविदेचे काम पुर्ण होणेसाठी अंदाजे ०३ महिने कालावधी लागणार आहे. त्यामुळे मे. संत गाडगेबाबा महाराज बेरोजगार संस्था दापोडी यांची ठेकेदार म्हणून दिनांक ०१/०४/२०१८ ते दिनांक ३०/०६/२०१८ अखेर अथवा नविन निविदा कार्यवाही पुर्ण होऊन नवीन संस्थांना कामकाज आदेश देईपर्यंत यापैकी जे प्रथम होईल त्या कालावधी पर्यंत मुदतवाढ देणे व याकामी येणा-या अंदाजे र.रु.५५,०४,९७०/- (अक्षरी र.रू.पंच्चावन्न लाख चार हजार नऊशे सत्तर फक्त) अथवा प्रत्यक्ष होणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २५१७ विषय क्रमांक - ११
दिनांक – ११/०४/२०१८ विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय
सूचक – मा.नम्रता लोंढे अनुमोदक – मा.विलास मडिगेरी

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आमुका/३/कावि/२१०/२०१८ दि.२७/३/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ क्षेत्रीय कार्यालयातील म.न.पा. चे TATA ACE वाहनामार्फत घरोघरचा कचरा गोळा करणे व संकलन केंद्र येथे वाहुन नेणेचे कामासाठी उपलब्ध वाहनांवर ५३ वाहन चालक, ३ सुपरवायझर व १०६ कामगार पुरविणे कामी ई-निविदा नोटीस क्र.६/२०१४-१५ प्रसिध्द करुन १ वर्ष कालावधीकरीता निविदा मागविणेत आल्या होत्या. सदरची निविदा किमान वेतन दराच्या असुन यामध्ये अंदाजपत्रक तयार करताना कामगारांचे वेतन व भत्ते

यापोटी देय असणारी रक्कम ९०% असुन निविदाधारकांना सेवाशुल्क म्हणून १०% असे रकमेचे विभाजन करणेत आले होते. यामध्ये कामगारांचे वेतन व भत्ते र.रु. १,९०,६३,०५२/- + सेवाशुल्क र.रु. १९,०६,३०५/- अशी एकूण र.रु.२,०९,६९,३५७/- एवढी निविदेची अंदाजपत्रकीय किंमत आहे. मे. भारतीय महिला स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित यांनी सेवाशुल्काच्या ८३.००% कमी दराने (र.रु.३,२४,०००/-) व एकूण निविदा रकमेच्या ७.५४% कमी दराने निविदा सादर केली होती. सदरचे दर लघुत्तम असल्याने दर स्विकृत होऊन मा. स्थायी समिती ठराव क्र.११८१६ दि.२३/०६/२०१५ अन्वये त्यांची १ वर्ष कालावधीसाठी ठेकेदार म्हणून नेमणूक करणेस मान्यता मिळालेली आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ क्षेत्रीय कार्यालयातील म.न.पा. चे TATA ACE वाहनामार्फत घरोघरचा कचरा गोळा करणे व संकलन केंद्र येथे वाहुन नेणे या कामासाठी निविदेमध्ये नमूद केलेप्रमाणे कामगार उपलब्ध करणे व अन्य वाहनांसाठी ७ वाहन चालक पुरविणेकामी त्यांना आदेश क्र.आमुका/३/कावि/ २०१/२०१५ दि.२१/०७/२०१५ अन्वये दि.२४/०७/२०१५ पासून दि.२३/०७/२०१६ पर्यंत १ वर्ष कालावधीसाठी नेमणूक करणेत आली आहे. तद्नंतर या कामासाठी वेळोवेळी मुदतवाढ देवून कामकाज सुरु आहे. सदर कामाची मुदत दि.३१/१०/२०१७ अखेर संपुष्टात आली आहे. सदर निविदेचा मुदतवाढ कालावधी दि.३१/१०/२०१७ रोजी संपुष्टात आल्याने, नियुक्त ठेकेदार यांनी मुदतवाढ कालावधीत काम करणेस नकार दर्शविलेला आहे. त्यामुळे मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.१३०६ दि.१५/११/२०१७ अन्वये महानगरपालिकेच्या फ प्रभाग कार्यालयाकडील काम मे.राजलक्ष्मी स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या., यांचेकडून दि.३१/०१/२०१८ अखेर ठेकेदार म्हणून नियुक्ती करुन सध्याच्या निविदा दराने करुन घेणेस व येणा-या खर्चास मान्यता दिलेली आहे. या कामास मुदतवाढ आदेश क्र. आमुका/३/कावि/४८७/२०१७, दि.२६/१२/२०१७ अन्वये देणेत आलेला आहे. सदर कामाची मुदत दि.३१/०१/२०१८ रोजी संपुष्टात आलेली आहे. मा. स्थायी समितीकडील ठराव क्र.२३४२ दि.२८/०२/२०१८ अन्वये दि.०१/०२/२०१८ ते दि.३१/०३/२०१८ अखेर मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदर कामाची मुदतवाढ दि.३१/०३/२०१८ अखेर संपुष्टात येत आहे. या कामाच्या नविन निविदेचे कामकाज अंतिम टप्प्यात आले असून निविदेचे काम पुर्ण होणेसाठी अंदाजे ०३ महिने कालावधी लागणार आहे. सध्या संस्थेमार्फत ६० वाहनचालक, ३ सुपरवायजर व १०६ कामगार उपलब्ध करुन कामकाज सुरु आहे. त्यामुळे मे.राजलक्ष्मी स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या., यांची ठेकेदार म्हणून दिनांक ०१/०४/२०१८ ते दिनांक ३०/०६/२०१८ अखेर अथवा नविन निविदा कार्यवाही पुर्ण होऊन नवीन संस्थांना कामकाज आदेश देईपर्यंत यापैकी जे प्रथम होईल त्या कालावधी पर्यंत मुदतवाढ देणेस व याकामी येणा-या अंदाजे खर्च र.रु.७४,९४,५५६/- (अक्षरी र.रू.चौ-याहत्तर लाख चौ-याण्णव हजार पाचशे छप्पन्न फक्त) अथवा होणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २५१८ | विषय क्रमांक - १२
दिनांक – ११/०४/२०१८ | विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय
सूचक – मा.सारिका लांडगे | अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आमुका/३/कावि/२०९/२०१८ दि.२७/३/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ड क्षेत्रीय कार्यालयातील म.न.पा. चे TATA ACE वाहनामार्फत घरोघरचा कचरा गोळा करणे व संकलन केंद्र येथे वाहुन नेणेचे कामासाठी उपलब्ध वाहनांवर ४७ वाहन चालक, ३ सुपरवायझर व ९४ कामगार पुरविणे कामी ई-निविदा नोटीस क्र. ५/२०१४-१५ प्रसिध्द करुन १ वर्ष कालावधीकरीता निविदा मागविणेत आल्या होत्या. कामगारांचे वेतन व भत्ते र.रु.१,६९,४६,६१२/- + सेवाशुल्क र.रु.१६,९४,६६१/-अशी एकूण र.रु.१,८६,४१,२७३/- एवढी निविदेची अंदाजपत्रकीय किंमत आहे. निविदेसाठी सेवाशुल्क रकमेवर पात्रता हा निकष ठेवणेत आला होता. त्यानुसार मे. सावित्री महिला स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित यांनी सेवाशुल्काच्या ८१.५०% कमी दराने (र.रु.३,१३,५१०/-) व एकूण निविदा रकमेच्या ७.४१% कमी दराने निविदा सादर केली होती. सदरचे दर लघुत्तम असल्याने त्यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ड क्षेत्रीय कार्यालयातील म.न.पा. चे TATA ACE वाहनामार्फत घरोघरचा कचरा गोळा करणे व संकलन केंद्र येथे वाहुन नेणे या कामासाठी निविदेमध्ये नमूद केलेप्रमाणे कामगार उपलब्ध करणे तसेच अन्य वाहनांसाठी ७ वाहन चालक पुरविणेकामी आदेश क्र.आमुका/३/कावि/२००/२०१५ दि.२१/०७/२०१५ अन्वये दिनांक २३/०७/२०१६ अखेर ठेकेदार म्हणून नेमणूक करणेत आली होती. त्यानंतर सदर कामाची मुदत दि.२३/०७/२०१६ रोजी संपुष्टात आल्यानंतर मा.स्थायी समिती ठराव क्र.१७१०५,दि.०६/०९/२०१६ अन्वये दि.२४/७/२०१६ ते दि.२/१/२०१७ पर्यंत मुदतवाढ देणेस तसेच ३ सुपरवायजर व २ वाहनचालक जादा उपलब्ध करुन देणेस मान्यता देण्यात आलेली आहे. तद्नंतर या कामासाठी वेळोवेळी मुदतवाढ देवून कामकाज सुरु आहे. सदर कामाची मुदत दि.३१/०१/२०१८ अखेर संपुष्टात आलेली आहे. मा. स्थायी समिती ठराव क्र.२३४१ दि.२८/०२/२०१८ अन्वये या कामास दि.३१/०३/२०१८ अखेर पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदर मुदतवाढ दि.३१/०३/२०१८ रोजी संपुष्टात येत आहे. सध्या संस्थेमार्फत ५६ वाहनचालक, ६ सुपरवायजर व ९४ कामगार उपलब्ध करुन कामकाज सुरु आहे. या कामाच्या नविन निविदेचे कामकाज अंतिम टप्प्यात आले असून निविदेचे काम पुर्ण होणेसाठी अंदाजे ०३ महिने कालावधी लागणार आहे. त्यामुळे मे. सावित्री महिला स्वंयरोजगार सेवा सह. संस्था मर्या. यांची ठेकेदार म्हणून दि.०१/०४/२०१८ ते दि.३०/०६/२०१८ अखेर अथवा नविन निविदा कार्यवाही पुर्ण होऊन नवीन संस्थांना कामकाज आदेश देईपर्यंत यापैकी जे प्रथम होईल त्या कालावधी पर्यंत मुदतवाढ देणेस व याकामी होणा-या अंदाजे र.रु.६८,८९,६९६/- (अक्षरी र.रू. अडूसष्ट लाख एकोणनव्वद हजार सहाशे शहाण्णव फक्त) अथवा प्रत्यक्ष होणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – २५१९ विषय क्रमांक - १३
दिनांक – ११/०४/२०१८ विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.साधना मळेकर
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आमुका/३/कावि/२०८/२०१८ दि.२७/३/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ क्षेत्रीय कार्यालयातील म.न.पा. चे TATA ACE वाहनामार्फत घरोघरचा कचरा गोळा करणे व संकलन केंद्र येथे वाहुन नेणेचे कामासाठी उपलब्ध वाहनांवर ४५ वाहन चालक, ३ सुपरवायझर व ९० कामगार पुरविणे कामी ई-निविदा नोटीस क्र.४/२०१४-१५ प्रसिध्द करुन निविदा मागविणेत आल्या होत्या. कामगारांचे वेतन व भत्ते र.रु.१,६२,४१,१३२/- + सेवाशुल्क र.रु.१६,२४,११३/- अशी एकूण र.रु.१,७८,६५,२४५/- एवढी निविदेची अंदाजपत्रकीय किंमत होती. यामध्ये दर ६ महिन्याने किमान वेतन दरातील विशेष भत्याची वाढ देय राहणार आहे. मे. भारतीय महिला स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित यांनी सेवाशुल्काच्या ९८.५२% कमी दराने (र.रु.२४,०००/-) व एकूण निविदा रकमेच्या ८.९६% कमी दराने निविदा सादर केली होती. सदरचे दर लघुत्तम असल्याने दर स्विकृत होऊन मा.स्थायी समिती ठराव क्र.११८१७ दि.२३/०६/२०१५ अन्वये त्यांची १ वर्ष कालावधीसाठी ठेकेदार म्हणून नेमणूक करणेस मान्यता मिळालेली आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ क्षेत्रीय कार्यालयातील म.न.पा. चे TATA ACE वाहनामार्फत घरोघरचा कचरा गोळा करणे व संकलन केंद्र येथे वाहुन नेणे या कामासाठी निविदेमध्ये नमूद केलेप्रमाणे कामगार उपलब्ध करणे व अन्य वाहनांसाठी ७ वाहन चालक पुरविणेकामी त्यांना आदेशक्र.आमुका/३/कावि/१९९/२०१५ दि.२१/०७/२०१५ अन्वये दि.२४/०७/२०१५ पासून दि.२३/०७/२०१६ पर्यंत १ वर्ष कालावधीसाठी नेमणूक करणेत आली होती. तद्नंतर या कामासाठी वेळोवेळी मुदतवाढ देवून कामकाज सुरु आहे. सदर कामाची मुदतवाढ दि.३१/१०/२०१७ अखेर संपलेनंतर नियुक्त ठेकेदार यांनी पुढील मुदतवाढ कालावधीत काम करणेस नकार दर्शविल्याने निविदेतील सेकंड लोएस्ट मे.राजलक्ष्मी स्वयंरोजगार सहकारी संस्था मर्या., यांची निविदेतील मंजूर दराने ठेकेदार म्हणून नियुक्ती करणेस मान्यता दिलेली आहे. त्यास अनुसरुन मे.राजलक्ष्मी स्वयंरोजगार सहकारी संस्था मर्या., यांना दि.०१/११/२०१७ ते दि.३१/०१/२०१८ अखेर मुदतवाढ कामाचे आदेश देण्यात आलेले आहे.तसेच सदर कामाची मुदतवाढ दि.३१/०१/२०१८ रोजी संपुष्टात आलेली आहे. त्यानंतर मा. स्थायी समिती ठराव क्र.२३४० दि.२८/०२/२०१८ अन्वये या कामास दि.३१/०३/२०१८ अखेर पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदर मुदतवाढ दि.३१/०३/२०१८ रोजी संपुष्टात येत आहे. तरी या कामाच्या नविन निविदेचे कामकाज अंतिम टप्प्यात असून त्यास काही कालावधी लागणार आहे. त्यामुळे या कामासाठी नियुक्त ठेकेदार यांची दिनांक ०१/०४/२०१८ ते दिनांक ३०/०६/२०१८ अखेर अथवा नविन निविदा कार्यवाही पुर्ण होऊन नवीन संस्थांना कामकाज आदेश देईपर्यंत यापैकी जे प्रथम होईल त्या कालावधी पर्यंत मुदतवाढ देणेस व याकामी येणा-या अंदाजे

र.रु.६३,५८,८७५/- (अक्षरी र.रू. त्रेसष्ट लाख अठ्ठावन्न हजार आठशे पंच्याहत्तर फक्त) अथवा प्रत्यक्ष होणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २५२० विषय क्रमांक - १४
दिनांक – ११/०४/२०१८ विभाग – जलनिःसारण
सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक–मा.नम्रता लोंढे
संदर्भ– मा.सहशहर अभियंता यांचे जावक क्र.जनि/२/कावि/९९१/२०१८ दि.२७/०३/२०१८

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ (१ ते ८) मधील निविदा कामांचे अवलोकन होवुन नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे तसेच भाववाढ कलमानुसार भाववाढ देय असल्यास मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहून ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(ममता विनायक गायकवाड)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/७/कावि/१५५/२०१८
दिनांक - ११/०४/२०१८

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

**(जा.क्र. डक्षेका/३/कावि/२५४/२०१८ दि.२३/०३/२०१८ विषय क्र.६ चे लगत)**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

ड क्षेत्रीय कार्यालय, रहाटणी -17

(विषयपत्र क्र.डक्षेका/3/कावि/254 /2018 दि. 23/03/2018 लगत)

प्रपत्र " अ "

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेची तारीख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेश दिनांक | निविदा रक्कम | स्विकृत दर | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मे. अेस कम्युनिकेशन्स | विद्युत/ड प्रभाग/Prabhag/4/4/2017-2018 | ड प्रभाग कार्यालयातील दुरध्वनी यंत्रणेची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे (2017-2018) | 14/03/2018 | डक्षेका/03/कावि/250/2018 | 21/03/2018 | 146054 | -6.00% कमी | 137291 |
| 2 | मे. मोरया मंडप डेकोरेटर्स | विद्युत/ड प्रभाग/Prabhag/10/4/2017-2018 | वाकड उपविभागांतर्गत विविध कार्यक्रमाकरीता तात्पुरत्या स्वरुपाची ध्वनिक्षेपण, सोसोटीव्ही, जनरेटर व प्रकाश व्यवस्था करणे. | 19/03/2018 | डक्षेका/03/कावि/251/2018 | 23/03/2018 | 999482 | -0.99% कमी | 989587 |
| | एकूण | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | 1126878 |

सहा. आयुक्त
तथा क्षेत्रिय अधिकारी
ड क्षेत्रीय कार्यालय रहाटणी-17
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

D:\Shri Ghadge IMP Data\Ganesh\विद्युत विभाग\Docket Elec\Nagarsachiv Docet - Elec 4 - 23-3.doc

## (जा.क्र. पापु/६/कावि/१२८०/२०१८ दि.२२/०३/२०१८ विषय क्र.७ चे लगत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८
पाणी पुरवठा विभाग
क्र.पापु/६/कावि/१२८०/२०१८
दि.२२/०३/२०१८

प्रपत्र अ ( १ ते १ )

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेली तारिख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा ओदशाची तारीख | निविदा रक्कम | स्विकृत दर | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | मे. बजरंगबली कन्स्ट्रक्शन | २५/१९/२०१७-१८ | प्रभाग क्र. ६४ दापोडी व परिसरात येथील सी.आय.पाईप लाईन बदलुन नविन पाईप टाकणे. | २८/०२/२०१८ | पापु/६/कावि/१२६२/२०१८ | १५/०३/२०१८ | २३,३४,२२८/- | ११.०० % कमी | २०,७७,४६२/- |

सह शहर अभियंता
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८

**(जा.क्र. जनि/२/कावि/९९१/२०१८ दि.२७/०३/२०१८ विषय क्र.१४ चे लगत)**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी१८
जलनिसारण विभाग
पत्र क्र जनि/२/कावि/९५१/18
दिनांक २७/३/2018

## प्रपत्र - अ (पान क्र. १ )

जलनिसारण विभाग

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेली तारीख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेशची तारीख | निविदा रक्कम | स्विकृत दर (कमी) | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | M/s LAND MARK CORPORATION PVT. LTD. | 15/3/2017-18 | चिंचवड मैलाशुध्दीकरण केंद्राअंतर्गत आनंदनगर झोपडपट्टीमध्ये जलनि:सारण नालिका टाकणे. | 28-02-2018 | जनि/२/कावि/933/18 | 07-03-2018 | 22,49,969 | 22.95 | 17,33,601 |
| 2 | M/s Chotelal Chauhan | 15/23/2017-18 | कासारवाडी मलशुद्धीकरण केंद्राअंतर्गत प्रभाग क्र.33 गवळीनगर येथे मलवाहिन्यांची सुधारणा कामे करणे. | 28-02-2018 | जनि/२/कावि/944/18 | 13-03-2018 | 14,97,774 | 17.00 | 12,43,152 |
| 3 | M/s Chotelal Chauhan | 15 /15 /2017-19 | कासारवाडी मलशुद्धीकरण केंद्राअंतर्गत प्रभाग क्र.33 गवळीनगर मधील हुतात्मा चौक व जय महाराष्ट्र चौक परिसरात मलवाहिन्यांची सुधारणा कामे करणे. | 28-02-2018 | जनि/२/कावि/947/18 | 13-03-2018 | 14,96,737 | 17.02 | 12,41,992 |
| 4 | M/s Chotelal Chauhan | 15/ 19 /2017-20 | कासारवाडी मलशुद्धीकरण केंद्राअंतर्गत प्रभाग क्र.३६ लांडेवाडी येथील गुळवेवस्ती मधील उर्वरीत भागात मलनि:सारण विषयक कामे करणे. | 28-02-2018 | जनि/२/कावि/948/18 | 13-03-2018 | 14,95,084 | 17.00 | 12,40,920 |
| 5 | M/s. SANJAY CONTRACTOR | 15/8/2017-18 | कासारवाडी मलशुद्धीकरण केंद्राअंतर्गत प्रभाग क्र.३० चक्रपाणी वसाहत येथील उर्वरीत भागात मलनि:सारण व्यवस्थेमध्ये सुधारणा करणे. | 25-01-2018 | जनि/२/कावि/874/18 | 23-02-2018 | 22,49,317 | 24.93 | 16,88,562 |
| 6 | M/S SURAJ CONTRACTOR | 15 /16 /2017-18 | चिंचवड व आकुर्डी मैलाशुद्धीकरण केंद्राअंतर्गत अजंठानगर, शरदनगर या भागात जलनि:सारण नलिका टाकणे. | 18-02-2018 | जनि/२/कावि/886/18 | 26-02-2018 | 22,49,992 | 27.08 | 16,40,694 |
| 7 | M/s Ranjit Enterprises | 20/3/2017-18 | कासारवाडी मैलाशुध्दीकरण केंद्राअंतर्गत सॅण्डविक कॉलनी मधील संत तुकाराम नगर व संभाजी नगर, महादेव नगर इत्यादी ठिकाणी मलनि:सारण नलिकांमध्ये सुधारणा करणे. | 16-02-2018 | जनि/२/कावि/887/18 | 26-02-2018 | 14,99,682 | 23.40 | 11,48,756 |
| 8 | M/s SHREE GURUDATTA ENTERPRISES | 21/12/2017-18 | फ क्षेत्रिय कार्यालयातील चिखली प्रभाग क्र.४ व ५ मधिल ड्रेनेज लाईन व चेंबरची वार्षिक ठेकेदार पध्दतीने देखभाल दुरुस्ती करणे. | 23-02-2018 | जनि/२/कावि/912/18 | 03-03-2018 | 23,33,614 | 32.00 | 15,86,858 |

सह शहर अभियंता
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८